REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 11 | ISSUE - 11 | AUGUST - 2022

# स्वयंसहाय्यता गटातील महिलांचा कौटुंबिक निर्णय प्रक्रियेत सहभाग

डॉ. महेंद्रकुमार मेश्राम
सहयोगी प्राध्यापक, ऑरेंज सिटी समाजकार्य महाविद्यालय, नागपूर

## ▪ प्रस्तावना:



'आन्तरक्रियात्मकता' (Interactionality) हा वर्तनाच्या सामाजिकतेचा सारगुण आहे. आन्तरक्रियात्मक संबंध (1) व्यक्ति-व्यक्तींमध्ये, किंवा (2) व्यक्ति-गटामध्ये, किंवा (3) गटा-गटांमध्ये दिसून येतात. त्याचप्रमाणे ते सामाजिक जीवनाच्या विविध क्षेत्रात दिसून येतात. कुटुंब, शेजार, व्यवसाय, क्रीडा इत्यादी विविध सामाजिक मंडळे (Associations), तसेच विवाह, वित्त, वर्ग, जाती इत्यादी सामाजिक संस्था (Institutions) तसेच सभा, जमाव, जनता इत्यादी मूर्तामूर्त समूह व रूढी, फॅशन, प्रचार, आन्दोलने इत्यादी सामाजिक वर्तन प्रकार - या सर्व संदर्भात वेगवेगळया प्रकारचे आन्तरक्रियात्मक संबंध व्यक्ति-व्यक्तींमध्ये वा गटांमध्ये निर्माण होत असतात (हरोलीकर, 1968).

आधुनिक लोकशाहीप्रधान भारतीय वा अन्य समाजात अशा प्रकारचे विविध संबंध आता दृढमूल झालेले दिसतात. आधुनिक गतिशील समाजजीवनामध्ये व्यक्तिला विविध प्रकारच्या सामाजिक समूहांमध्ये सहभागी व्हावे लागते. विविध जटिल सामाजिक प्रसंगातून जावे लागते व त्यांमधूनच त्याच्या व्यक्तित्वाची घडण होत असते. ''जीवन ही एक व्यक्तीचे 'आंतरिक संबंध' व 'बहिर्गत संबंध' यामधील समायोजनाची प्रक्रियाच होय'' या प्रसिध्द सूत्राची घोषणा हर्बर्ट स्पेन्सर यांनी केली. प्रस्तुत अध्ययनाच्या दृष्टीने स्पेन्सरने मांडलेले सूत्र अत्यंत महत्वाचे आहे.

मनुष्याने जन्म घेतल्यानंतर त्याचा ज्या मुलभूत सामाजिक मंडळाशी संबंध येतो ते मंडळ म्हणजे कुटुंब होय. मानवाचे सामाजिक जीवन विभिन्न सामाजिक समूह, मंडळ आणि संस्था याद्वारे प्रगट होत असते. व्यक्तीचे सामाजिकरण कुटुंबातूनच होत असते. तो आपले कार्य, संस्कार, जीवनपध्दती आणि भूमिका कुटुंबातूनच शिकत असतो. कुटुंबाची गरज ही नैसर्गीक आहे, असे सांगून स्त्रीवाद्यांच्या अतिजहाल भूमिकेवर टीका करतांना बेट्टी फ्रिडन म्हणतात, 'आपले वैयक्तिक जीवन राजकीय देखाव्याचा भाग म्हणून जगण्याचा जहाल स्त्रीवाद्यांचा आग्रह, पुरूष हा शत्रू, मातृत्व व कुटुंब म्हणजे जुलूम, लैंगिक शरणागती, स्वत:शी प्रतारणा म्हणजे मानवाच्या ममत्व, शारीरिक संबंध, प्रजोत्पादन हया मुलभूत गरजाच नाकारणे आहे. अशा तऱ्हेने वागणे म्हणजे आवश्यक त्या राजकीय परिवर्तनासाठी जरूर असलेली शक्ती व उर्मी खच्ची करणे आहे' कुटुंब हे वैयक्तिक जीवनास समृध्द करणारे पोषक द्रव्य आहे. आपला जन्म व संगोपन कुटुंबातच झाले, असे बेट्टी फ्रिडन यांनी कुटुंबाच्या आवश्यकतेविषयी आग्रहपूर्वक म्हटले आहे (आपटे व रोडे, 2012).

देशमुख, रणदिवे आणि मुर्थी, (2005) यांच्या मते, सक्षमीकरण हे कुणालाही प्रदान करता येत नाही किंवा कोणतीही संस्था ते साध्यही करू शकत नाही. मुळत: ही परिवर्तनाची प्रक्रिया आहे, ज्याद्वारा विषमता असलेल्या संबंधांमध्ये समानता प्रस्थापित केली जाते. स्वत:च्या मालकीचे घर, पोषक आहार, वस्त्र, शिक्षणाच्या सोयीसुविधा, आरोग्याची काळजी, स्वयंरोजगाराची संधी इ. हक्क मिळविण्याच्या प्रक्रियेत सहभागी होऊन वंचित घटक 'सक्षमीकरण' साध्य करू शकतो. या प्रक्रियेमध्ये 'समान सहभागीत्व' हे विषमतेकडून समानतेकडे घेऊन जाते. या प्रक्रियेत त्या व्यक्तीला कितपत 'मोकळीक' किंवा 'जागा' दिली जाते किंवा ती व्यक्ती तीला हवी ती 'मोकळीक' किंवा 'जागा' कितपत निर्माण करते यावर अवलंबून आहे. स्त्रीची स्वायत्ता निर्धारीत करणारे अनेक घटक आहेत. स्त्रीचे कुटुंबातील आणि समाजातील स्थान यावर तीचे आत्मभान, आत्मविश्वास आणि स्वावलंबन अवलंबून आहे (विमल रामचंद्रन, 2002).

महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने विचार करता, हे दोन्ही घटक परस्परपूरक व परस्परावलंबी आहेत. महिलांचे सक्षमीकरण अभ्यासतांना केवळ आर्थिक स्थितीत कितपत बदल झाला किंवा महिलांचा सामाजिक दर्जा कितपत उंचावला याबरोबरच स्त्री स्वत:चे, स्वत:च्या कुटुंबाचे आणि स्वत:च्या समाजजीवनाचे निर्णय घेण्यास कितपत सक्षम झाली आहे, याचे अध्ययन करणे अत्यंत गरजेचे आहे.

## ▪ अध्ययनाचे उद्देश :

स्वयंसहाय्यता गटात सहभागी महिलांना कौटुंबिक निर्णय प्रक्रियेत कितपत सहभागी करून घेतले जाते याबाबतचे अध्ययन करणे.

## ▪ अध्ययनाचे विश्व :

प्रस्तुत अध्ययनात सन 2008 ते 2011 या कालावधीत स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेअंतर्गत गडचिरोली जिल्हयातील 12 पंचायत समितींपैकी 11 पंचायत समिती अंतर्गत लाभान्वित करण्यात आलेल्या 360 स्वयंसहाय्यता गटांतील एकूण 3974 महिला हया संशोधनाच्या विश्व होत्या.

## ▪ नमुना निवड :

एकूण 3974 महिला हया संशोधनाच्या विश्व होत्या. सदर संशोधन विश्वातून नमुना म्हणून संभाव्यता नमुना निवड पध्दतीतील (Probability Sampling) साधा यादृच्छिक नमुना निवडीच्या (Simple Random Sampling) लॉटरी तंत्राने (Lottary Technique) 550 महिलांची निवड करण्यात आली.

## ▪ महिलांचा कौटुंबिक निर्णय प्रक्रियेत सहभाग:

भारतीय समाजव्यवस्थेतील महिलांचे दुय्यम स्थान हे महिलांना कुटुंबातील निर्णय प्रक्रियेपासून वंचित ठेवते. विल्ली यांच्या मते, दैनंदिन जीवनात महिलांना निर्णय घेण्याचा अधिकार अत्यल्प असतो. साप्ताहिक सकाळ दि. 1 मार्च, 2003 नुसार, विवाहीत स्त्रियांपैकी अवघ्या 37 टक्के स्त्रियांना स्वत:ची आरोग्य काळजी, घरगुती खरेदी, कुटुंबातील वा इतर नातेवाईकांना भेटण्यासंबंधीचा निर्णयात सहभाग होता येते. प्रस्तुत अध्ययनातील महिलांना कौटुंबिक निर्णय प्रक्रियेत कितपत सहभागी करून घेतले जाते याबाबतचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**महिलांचा कौटुंबिक निर्णय प्रक्रियेत सहभाग दर्शविणारी सारणी**

| अ. क्र. | कौटुंबिक निर्णय | सहभागाचे प्रमाण | | | | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **1** बऱ्याच प्रमाणात | **2** काही प्रमाणात | **3** अत्यल्प प्रमाणात | **4** सहभाग नाही | |
| **1.** | मुलांना जन्म देणे | **099** (18%) | **321** (58.4%) | **127** (23.1%) | **003** (0.5%) | **550 (100%)** |
| **2.** | मुलांचे शिक्षण | **107** (19.5%) | **314** (57.1%) | **127** (23.1%) | **002** (0.4%) | **550 (100%)** |
| **3.** | मुलांचे विवाह विषयक बाबी | **109** (19.8%) | **316** (57.5%) | **123** (22.4%) | **002** (0.4%) | **550 (100%)** |
| **4.** | घर/जमीन/संपत्ती खरेदी-विक्री | **106** (19.3%) | **317** (57.6%) | **124** (22.5%) | **003** (0.5%) | **550 (100%)** |
| **5.** | कर्ज व्यवहार | **108** (19.6%) | **319** (58%) | **119** (21.6%) | **004** (0.7%) | **550 (100%)** |
| **6.** | शेती | **109** (19.8%) | **297** (54%) | **105** (19.1%) | **039** (7.1%) | **550 (100%)** |
| **7.** | व्यवसाय/उद्योग | **110** (20%) | **316** (57.5%) | **119** (21.6%) | **005** (0.9%) | **550 (100%)** |

उपरोक्त सारणीवरून असे निदर्शनास येते की, कौटुंबिक निर्णयाच्या सातही प्रकारात काही प्रमाणात सहभागी असणाऱ्या महिलांचे प्रमाण महत्तम असून अजिबात सहभाग नसणाऱ्या महिलांचे प्रमाण अत्यल्प होते.

स्वयंसहाय्यता गटातील महिलांचा मुलांना जन्म देण्याबाबतच्या निर्णय प्रक्रियेत काही प्रमाणात सहभाग असणाऱ्या महिलांचे प्रमाण 58.4 टक्के असून अजिबात नसणाऱ्या महिलांचे प्रमाण 3.05 टक्के होते. मुलांना जन्म देणे हा निर्णय पती-पत्नी या दोघांनी संयुक्त घ्यावयाचा असतो व हा निर्णय घेत असतांना पत्नीच्या म्हणजेच महिलेच्या मताला अधिक प्राधान्य देणे गरजेचे असते. परंतु, याबाबतच्या निर्णयात फक्त 18 टक्के महिलांचा बऱ्याच प्रमाणात सहभाग दिसून आला असून अत्यल्प सहभाग असणाऱ्या महिलांचे प्रमाण 23.1 टक्के होते. स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेअंतर्गत लाभान्वित स्वयंसहाय्यता गटातील बहुतांशी महिलांचा मुलांना जन्म देण्याबाबतच्या कौटुंबिक निर्णय प्रक्रियेत काही प्रमाणात सहभाग दिसून येत असून 3.05 टक्के महिला आपल्या या मुलभूत अधिकारापासून वंचित होत्या तर 23.1 टक्के महिलांना फारसे विचारात घेतले गेले नसून त्यांचा या निर्णय प्रक्रियेत अत्यल्प सहभाग असल्याचे निदर्शनास आले. एकीकडे भारत देश हा महासत्ता होण्याचे महास्वप्न पाहत आहे तर दुसरीकडे गडचिरोली जिल्हयातील फक्त 18 टक्के महिलांचा मुलांना जन्म देण्याबाबतच्या कौटुंबिक निर्णयात अपेक्षीत सहभाग असणे ही विसंगती दिसून येते.

मुलांना कोणत्या शाळेत/महाविद्यालयात प्रवेशित करावे, कोणते शिक्षण द्यावे, त्याची निवासाची व्यवस्था कुठे करावी, त्याच्या दैनंदिन शैक्षणिक गरजा कशाप्रकारे पूर्ण कराव्यात इ. 'मुलांचे शिक्षण'विषयक कौटुंबिक निर्णयात काही प्रमाणात सहभागी असणाऱ्या 57.1 टक्के महिला असून या निर्णय प्रक्रियेत अजिबात सहभाग नसलेल्या 0.4 टक्के महिला आढळून आल्या होत्या. याबाबतच्या निर्णय प्रक्रियेत बऱ्याच प्रमाणात सहभागी असणाऱ्या महिलांचे फक्त 19.5 टक्के असून 23.1 टक्के महिलांना कुटुंबात याबाबत फारसे महत्व दिले गेले नसून त्यांचा या निर्णय प्रक्रियेत अत्यल्प सहभाग असल्याचे दिसून आले. अमुधा, (2013) यांच्या अध्ययनातील 86.5 टक्के महिलांनी त्यांच्या मुलांना शाळेमध्ये पाठविण्याबाबतचा निर्णय, 83 टक्के महिलांनी त्यांच्या मुलांना अंगणवाडी मध्ये पाठविण्याबाबतचा निर्णय 79.2 टक्के महिलांनी त्यांच्या मुलांना महाविद्यालयामध्ये पाठविण्याचा निर्णय स्वत: घेतला असल्याचे दिसून आले. मात्र, गडचिरोली जिल्हयातील स्वयंसहाय्यता गटातील बहुतांशी महिलांचा अद्यापही मुलांचे

शिक्षणाबाबत निर्णय प्रक्रियेत अपेक्षीत सहभाग नसून फक्त 19.5 टक्के महिलाच या निर्णय प्रक्रियेत सहभागी असल्याचे निदर्शनास आले. जन्मदात्या आईला तिच्या मुलांचे शिक्षणाबाबतचे अधिकार नसणे हे फुले-शाहू-आंबेडकरांच्या पुरोगामी महाराष्ट्रासाठी चिंतेची बाब आहे.

मुलांचे विवाह हा विषय प्रत्येक आई-वडीलासाठी अत्यंत भावनिक, जिव्हाळयाचा, आस्थेचा, काळजीचा, संवेदनशिल व कर्तव्यपूर्तीचा विषय असतो. वरील सारणीवरून असे दिसून येते की, स्वयंसहाय्यता गटातील 57.5 टक्के महिलांचा मुला-मुलीचे विवाह विषयक कौटुंबिक निर्णयात काही प्रमाणात सहभाग असून यासंदर्भातल्या निर्णयात सहभागी नसणाऱ्या महिलांचे प्रमाण 0.4 टक्के होते. प्रत्येक आई आपल्या मुलांच्या विवाहाचे स्वप्न पाहत असते. भारतीय समाज व्यवस्थेत विवाह हा संस्कार अत्यंत महत्वाच्या असून याबाबतच्या निर्णयात बऱ्याच प्रमाणात सहभागी असणाऱ्या महिलांचे प्रमाण 19.8 टक्के होते तर मुलांचे विवाहविषयक महत्वपूर्ण बाबींमध्ये 22.4 टक्के महिलांचा अत्यल्प सहभाग दिसून आला. मुलांचे विवाहाबाबतचे निर्णय पती-पत्नी-मुले यांनी संयुक्तपणे घेणे अपेक्षीत असते. परंतु, सदर निर्णयात पाहीजे त्या प्रमाणात सहभागी असणाऱ्या महिलांचे प्रमाण फक्त 19.8 टक्के असणे, हे कुटुंबात महिलांना दुय्यम वागणूक दिली जात असल्याचे निर्देशक आहे. 'मातृत्व' या गोंडस नावाखाली स्त्रीची महिमा गाणाऱ्या पुरूषप्रधान व्यवस्थेत तीच्या मुलांचे विवाहविषयक निर्णयात मात्र अपेक्षीत प्रमाणात सहभागी करून न घेणे ही 'सामाजिक विषमता' प्रस्तुत सारणीमध्ये निदर्शनास येते.

भारतीय पुरूषप्रधान समाजव्यवस्थेत महिला ही सत्ता, संपत्ती आणि समान संधी पासून वंचित असल्याचे विदारक चित्र दिसून येते. भारताचे संविधान आणि कायदे समानता प्रस्थापित करणारे आहेत. संपत्तीपासून वंचित महिलेला समान संधी प्रदान करणारे कायदे असले तरी, त्यांच्या अंमलबजावणीच्या अभावासोबतच तशी मानसिक स्विकृती व तयारी अद्यापही भारतीय समाजमनाची नाही. महिलांच्या नावे मत्ता निर्मिती हा स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेचा अलिखीत हेतू आहे. वरील सारणीमध्ये असे दिसून येते की, स्वयंसहाय्यता गटातील 57.6 टक्के महिलांना घर/जमीन/संपत्ती खरेदी-विक्रीच्या कौटुंबिक निर्णय प्रक्रियेत काही प्रमाणात सहभागी करून घेतले गेले असून 0.5 टक्के महिलांना यात अजिबात सहभागी करून घेतले गेले नाही. केवळ 19.3 टक्के महिलांचाच यात अपेक्षीत सहभाग असून अद्यापही 22.5 टक्के महिलांचा अत्यल्प सहभाग असून त्यांना याबाबत फारसे महत्व दिले जात नसल्याचे आढळून येते. घर/जमीन/संपत्ती खरेदी-विक्रीचे व आनुषंगिक निर्णय पती-पत्नी यांनी संयुक्तपणे घेणे अपेक्षीत असते. मात्र सदर निर्णयात फक्त 19.3 टक्के महिलांचा अपेक्षीत सहभाग दिसून येत असून कायद्याने पतीच्या संपत्तीमध्ये समान मालकी हक्क असणाऱ्या बहुतांश महिला प्रत्यक्षात संपत्तीच्या निर्णयाबाबतच्या मुलभूत अधिकारापासून बऱ्याच प्रमाणात वंचित असल्याचे दिसून आले. संपत्ती अर्जीत करण्यासाठी करावयाच्या श्रमात महिलांचा अधिकाधिक सहभाग घेतला जातो परंतु त्याचे मालकी हक्क व खरेदी-विक्रीचे अधिकार तिला नसतात. घर-शेती-जमीन-संपत्ती ही फक्त पुरूषांच्या नावे खरेदी-विक्री करण्याच्या भारतीय मानसिकतेत बदल होऊन संपत्तीचे मालकी हक्क महिलांच्या नावे करण्याचे विचारभान समाजात निर्माण झाल्यास महिला सक्षमीकरणाची वाट प्रशस्त होईल.

कुटुंबाचे अर्थकारण हे कायम पुरूषांच्या ताब्यात असते. पैसा कुठून आणायचा आणि कुठे खर्च करायचा हे सुध्दा पुरूषच ठरवित असतात. ग्रामीण भागात मजुरी करणाऱ्या महिला दिवसभर काबाडकष्ट करतात आणि मिळणारी मजुरी पुरूषांच्या हाती देतात. तसे न करणाऱ्या महिलेला कौटुंबिक हिंसाचारास सामोरे जावे लागते. मिळणाऱ्या उत्पन्नातून खर्च भागत नसल्याने कुटुंबांच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी अनेकदा कर्जव्यवहाराची गरज भासते. कुटुंबास कर्जव्यवहार करावयाचा असल्यास त्याचे निर्णय पुरूषच घेत असले तरी ते फेडतांना मात्र महिलांचा अधिकाधिक सहभाग घेतला जातो हे येथे उल्लेखनीय. उपरोक्त सारणीनुसार, कर्जव्यवहाराच्या कौटुंबिक निर्णय प्रक्रियेत 58 टक्के महिलांचा महिलांचा काही प्रमाणात सहभाग दिसून आला तर 0.7 टक्के महिलाचा यासंदर्भात अजिबात सहभाग नसल्याचे आढळले. कर्जव्यवहाराच्या निर्णय प्रक्रियेत 19.6 टक्के महिला बऱ्याच प्रमाणात सहभागी असल्या तरी 21.6 टक्के महिलांचा यात अत्यल्प सहभाग असल्याचे निदर्शनास येते. बासु, (2006) यांनी

केलेल्या अध्ययनात असे दिसून आले की, ज्या महिला स्वयंसहाय्यता गटाच्या सामुदायिक निर्णय प्रक्रियेत सक्रिय सहभागी असतात, त्याच महिलांना त्यांच्या स्वत:च्या कौटुंबिक निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घेण्याचे प्रमाण मात्र कमी असून कुटुंबातील इतर सदस्यांचे त्यावर नियंत्रण असते. वरील सारणीनुसार, कर्जव्यवहाराच्या कौटुंबिक निर्णय प्रक्रियेत अपेक्षीत सहभाग असणाऱ्या महिलांचे प्रमाण फक्त 19.6 टक्के असून बहुतांशी महिला या अधिकारापासून बऱ्याच प्रमाणात वंचित असल्याचे आढळून आले. कर्ज फेडत असतांना महिलांची मदत घेतली जाते, परंतू कर्ज घेत असतांना मात्र निर्णय प्रक्रियेत तिचा सहभाग घेतला जात नाही, हे पुरूषप्रधान व्यवस्थेने निरंकुशपणे एकहाती सत्ता ठेवल्याचे निर्देशक आहे.

शेती हा भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असून त्यात महिलांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. भारतीय महिला या अन्न-धान्याचे मूल्य, संख्या, आणि कामाचे तास यासंदर्भात मुख्य उत्पादक आहेत. आर्थिक उपक्रमात सहभागी एकूण पुरूषांपैकी 63 टक्के पुरूष हे शेतीमध्ये सक्रिय आहेत तर महिलांचे हेच प्रमाण 78 टक्के आहे. बहुतांशी ग्रामीण महिला मजूर हया शेतमजूर म्हणून काम करतात. प्रत्यक्ष शेती करणाऱ्या महिलांचे प्रमाण 37 टक्के आहे. शेतीची जवळपास 70 टक्के कामे महिला करतात. शेती विकास आणि संलग्न सेवा जसे पिक उत्पादन, पशुसंवर्धन, फलोत्पादन, पिक आल्यानंतरची प्रक्रिया, सामाजिक वनीकरण, मत्स्योत्पादन इ. कामात महिला अग्रणी भूमिका पार पाडत असूनही त्या दुय्यम व दुर्लक्षीत राहतात हे तथ्य आहे (मेश्राम, 2014). रांधा-वाढा-उष्टी काढा हा पारंपारीक व सांसारीक प्रपंच सांभाळणाऱ्या महिला पेरणी, खुरपनी, कापनी, मळणी ही सर्व कामे करतात. परंतू, शेतीचे निर्णय मात्र पुरूषच घेत असतात. वरील सारणीवरून असे दिसून येते की, शेतीबाबतच्या कौटुंबिक निर्णय प्रक्रियेत 54 टक्के महिलांचा काही प्रमाणात सहभाग असून याबाबतच्या निर्णयात सहभागी नसणाऱ्या महिलांचे प्रमाण 7.1 टक्के असल्याचे आढळून आले. शेतीबाबतच्या कौटुंबिक निर्णय प्रक्रियेत फक्त 19.8 टक्के महिला बऱ्याच प्रमाणात सहभागी असून यात अत्यल्प प्रमाणात सहभागी असणाऱ्या महिलांची संख्या 19.1 टक्के असल्याचे निदर्शनास आले. घरची सर्व कामे आटोपून सर्वांची मनोभावे सेवा करून शेतीवर दिवसभर काबाडकष्ट करणाऱ्या महिलेच्या वाटयाला कोणते पिक घ्यावे, कोणत्या खताची फवारणी करावी, मजूर किती लावायचे, रोवणी केव्हा करायची इ. साधेसाधे निर्णय घेण्यापासून महिलांना वंचित ठेवणाऱ्या भारतीय समाजव्यवस्थेत, जोपर्यंत 'कृषी क्षेत्रात महिलांचा कार्यक्षम सहभाग' वाढत नाही तोपर्यंत 'शाश्वत विकास' ही संकल्पना प्रत्यक्षात साकारली जाऊ शकत नाही. 'विदर्भातील शेतकरी आत्महत्या'सारखे प्रश्न ज्वलंत असून अशा समस्यांचा स्वयंसहाय्यता गटात सहभागी महिला समर्थपूर्ण मुकाबला करू शकतात. कारण, सामुदायिक शक्ती त्यांच्या पाठीशी असते, हे समाजातील पुरूषी मानसिकतेने जाणून घेऊन महिलांना शेतीबाबतच्या निर्णय प्रक्रियेत अधिकाधिक प्रमाणात सहभागी करून घेण्याचे व्यावहारीक, न्यायसंगत व समानतेचे विचार स्विकृत करणे आवश्यक आहे.

कुटुंबाच्या उपजिवीकेसाठी कोणताही व्यवसाय किंवा उद्योग कार्यान्वित केल्यास त्यातील श्रमात कुटुंबातील सर्व सदस्य कमीअधिक प्रमाणात सहभागी होत असतात. त्यातही कुटुंबातील प्रमुख महिलेचा यात सक्रिय सहभाग असतो. व्यवसायाच्या/उद्योगाच्या यशस्वीतेसाठी ती पुरूषाच्या तुलनेत अधिक श्रम वेचत असते व तसे करण्यास पुरूषी व्यवस्था तिला बाध्य करीत असते. परंतू, या व्यवसायाची किंवा उद्योगाची निवड करतांना पुरूषप्रधान व्यवस्था महिलांना विचारात घेत नाही. कुटुंबांतील सदस्याने कोणता व्यवसाय करावा याचे निर्णय कुटुंबातील पुरूषच घेत असतात. कुटुंबाच्या व्यवसायात महिलांनी फक्त श्रम वेचावे, विचारणा करू नये, अशी पुरूषी मानसिकता दिसून येते. वरील सारणीवरून, व्यवसाय/उद्योगाबाबतच्या कौटुंबिक निर्णय प्रक्रियेत 57.5 टक्के महिलांचा काही प्रमाणात सहभाग आढळून आला असून 0.9 टक्के महिलांचा यात अजिबात सहभाग नसल्याचे निदर्शनास आले. स्वयंसहाय्यता गटातील 20 टक्के महिला व्यवसाय/उद्योगाबाबतच्या कौटुंबिक निर्णयात बऱ्याच प्रमाणात सहभागी असल्या तरी 21.6 टक्के महिलांना याबाबत फारसे महत्व दिले गेले नसून त्यांचा अत्यल्प सहभाग दिसून आला. एकीकडे कुटुंबाच्या व्यवसायात महिलेने पूर्ण कष्ट वेचायचे परंतू त्याबाबतचे निर्णय मात्र पुरूषांनी घ्यायचे, असे विषम व विदारक चित्र दृष्टीपथास येते.

## निष्कर्ष व सारांश:

मुलांना जन्म देण्याच्या कौटुंबिक निर्णय प्रक्रियेत 18 टक्के, मुलांचे शिक्षणविषयक कौटुंबिक निर्णय प्रक्रियेत 19.5 टक्के, मुलांच्या विवाहविषयक बाबींच्या कौटुंबिक निर्णय प्रक्रियेत 19.8 टक्के, घर/जमीन/संपत्ती खरेदी–विक्रीच्या कौटुंबिक निर्णय प्रक्रियेत 19.3 टक्के, कर्जव्यवहाराच्या कौटुंबिक निर्णय प्रक्रियेत 19.6 टक्के, शेतीबाबतच्या कौटुंबिक निर्णय प्रक्रियेत 19.8 टक्के व व्यवसाय/उद्योगाच्या कौटुंबिक निर्णय प्रक्रियेत 20 टक्के, याप्रमाणे सरासरी 19.42 टक्के महिलांचे कौटुंबिक निर्णय प्रक्रियेत बऱ्याच प्रमाणात सहभाग दिसून आले असून हे प्रमाण महिलांची कौटुंबिक स्थिती निम्न असल्याचे निर्देशक आहे. असे असले तरी, उपरोक्त निर्णय प्रक्रियेत सरासरी निम्म्यापेक्षा अधिक महिला काही प्रमाणात सहभागी असल्याचे आढळून आले असून, हे महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने आशेचे किरण आहे. स्वयंसहाय्यता गटात सहभागी झाल्यानंतर महिलांचा निर्णय प्रक्रियेत सहभाग वाढतो, असे सुजा, (2012) यांच्या अध्ययनात दिसून आले होते. कौटुंबिक निर्णय प्रक्रियेत महिलांच्या सहभागाचे प्रमाण वाढविण्यासाठी शासन, स्वयंसेवी संस्था, बँका, महिला मंडळ, सामाजिक संघठना आणि राजकीय पक्ष यांनी विशेष व जाणीवपूर्वक प्रयत्न करण्याची गरज आहे. 'लिंग समभाव संचेतन कार्यक्रमाचे' आयोजन गावा-गावात व्हावे. महिलांप्रमाणेच गावातील पुरूषांना सुध्दा यात सहभागी करून घेण्यात यावे. गावातील किंवा परिसरातील परिवर्तनवादी पुरूषांना आयोजनात पुढाकार घेण्यास प्रोत्साहीत करावे. असे केल्यास स्त्री-पुरूष समतेचे विचार यामाध्यमातून रूजविले जातील. संसाराचा गाडा स्त्री आणि पुरूष, दोघांनी संयुक्तपणे पेलावयाचे असून त्याबाबतच्या निर्णय प्रक्रियेत स्त्रियांचा समान सहभाग असावा, हे विचारभान रूजविण्याचे कार्य स्वयंसहाय्यता गट, महिला मंडळ, सामाजिक संघटना, स्वयंसेवी संस्था व शासकीय यंत्रणा यांनी संयुक्तपणे चळवळीच्या रूपाने हाती घेतल्यास, या स्थितीत सकारात्मक परिवर्तन घडून येऊ शकते.

## संदर्भ:


- आपटे, ज.श. व रोडे, पुष्पा, (2012) भारतातील महिला विकासाची वाटचाल, पुणे: डायमंड पब्लिकेशन.
- साप्ताहिक सकाळ, दि. 1 मार्च, 2003.
- हरोलीकर, ल.ब., (1968) सामाजिक वर्तनाचे मानसशास्त्र, पुणे: व्हीनस प्रकाशन.
- Basu, J.P, (2006) Microfinance and Women Empowerment: An Empirical Study with special reference to West Bengal. http://www.igidr.ac.in/newspdf/money/mfc_10/Jyotish%20Prakash%20Basu_submission_55.pdf
- Deshmukh-Randive, Joy & Murthy, Ranjana K., (2005) Micro-credit, poverty and Empowerment: Lining the triad, New Delhi: Sage Publication.
- Meshram, Mahendrakumar, (2014) Women Empowerment in Agriculture for Preventing Farmers Suicide: Need of the Hour, Paper Presented in National Seminar on Farmer Suicide in Vidarbha in the Context of Argirian Crises, Nagpur, Seminar Proceedings, Tirpude College of Social Work, 26-27 Sept. 2013.
- Ramchandran, V., (2002) "Fertility and Women's Authonomy" Seminar, March, 2002.